| MHSO070007482007 | **<u>नियमित दरखास्त क्र. ४८/२००७ मधील नि.क्र.११६ वरील आदेश</u>**<br>(<u>भानुदास मांजरे व इतर वि. पिराजी राघु मांग व इतर</u>)<br>(<u>पारीत दिनांक – १८/०४/२०२६</u>) |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने/धनकोने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ५ड अमोल भिमराव खंडाळे हा दि. ११/०२/२०२३ रोजी मयत झाला आहे व तो अविवाहीत होता. त्यास वारस प्रतिवादी क्र. १ड, २ड, ३ड व ४ड हे याकामी वारस आहेत. त्यामुळे सदर कामी मयत प्रतिवादी क्र. ५ड याचे पुढे मयत असे लिहून त्यास कंस मारण्यात यावा व तशी दुरूस्ती दरखास्तीमध्ये करण्यास परवानगी मागितली आहे.

२. प्रतिवादी/ऋणकोतर्फे सदर अर्जाला म्हणणे दिले असून त्यांनी प्रस्तुत अर्ज नामंजुर करावे अशी विनंती केली आहे.

३. युक्तिवाद ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतची दरखास्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता दाखल केला आहे. वादीने त्याच्या कथानाच्या पृष्ठ्यार्थ नि. क्र.११९ वर शपथपत्र दाखल केलेले आहे तसेच सदर प्रतिवादी क्र. ५ड अमोल भिमराव खंडाळे यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. महत्वाचे म्हणजे, प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास दरखास्तीचे स्वरुप बदलणार नाही व सदर नियोजित दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे मला वाटते. त्याचप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांच्या मधील वाद हा कायमस्वरुपी मिटविण्याकरीता सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्याचे दिसुन येते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** वादीचा निशाणी क्र. ११६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तुतची दुरुस्ती ही १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्तीची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

KANCHAN JAYWANT KHOMANE
Digitally signed by KANCHAN JAYWANT KHOMANE
Date: 2026.04.18 16:27:06 +0530

(के.जे. खोमणे)
दिनांक – १८/०४/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पंढरपूर, जि. सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A.B. Sandrok |
| Court | - | 2nd Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 18/04/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 18/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 18/04/2026 |